मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पुणे-नाशिक एलीव्हेटेड मार्ग ‘दृष्टीक्षेपात’

## खासदार अमोल कोल्हे यांचा पाठपुरावा ; वाहतूक कोंडीतून होणार सुटका

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी-पुणे-नाशिक महामार्गाच्या रूंदीकरणाचे (एलीव्हेटेड कॉरिडॉर) चे काम मंजूर होऊन अनेक महिने उलटले. अखेर या कामासाठी सल्लागार नियुक्त करून, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. लोकसभेच्या आचारसंहितेमुळे वर्कऑर्डर देण्याचे काम थांबले आहे. आचारसंहिता संपल्यानंतर तत्काळ या महामार्गाच्या रस्ता रूंदीकरणाच्या कामास सुरुवात होणार आहे. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पाठपुरावा केल्यामुळे हे काम पूर्णत्वास येत आहे. नाशिक फाटा ते चांडोली महामार्ग रूंदीकरणामुळे नाशिक फाटा ते चाकणपर्यंत होणाऱ्या वाहतूक कोंडीचा विळखा सुटण्यास मदत होणार आहे.

महामार्गावर औद्योगिक साहित्याची जड वाहतूक, ओव्हरलोड वाहन, प्रवासी वाहने, दुचाकी यांची वाहतूक होते. त्यामुळे या महामार्गावर वारंवार कोंडी होते. विशेषतः भोसरी-लांडेवाडी चौक ते मोशी राजा शिवछत्रपती चौक, मोशी गावठाण परिसर, चिंबळी फाटा, आळंदी फाटा, चाकण परिसरात अधिक वाहतूक कोंडी होते. त्यामुळे महामार्ग रूंदीकरणाची गरज होती. नाशिक फाटा मोशी चांडोलीपर्यंत (राजगुरुनगर) शासनाकडून एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रस्तावित होता. रूंदीकरण एलिव्हेटेड झाल्यास नाशिक फाटा ते खेड अवघ्या वीस मिनिटांच्या अंतरावर येणार आहे.



### राष्ट्रीय महामार्ग होणार एलिव्हेटेड...

खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी शिरूर लोकसभा मतदार संघामध्ये येणारे तिन्ही महामार्ग एलिव्हेटेड करण्यासाठी पाठपुरावा जोरात केला. त्यानुसार ११९३७.३६ कोटींचा निधी मंजूर करून आणला आहे. त्यामध्ये पुणे-शिरूर NH-753F (रामवाडी जंक्शन ते शिरूर बायपास घोडनदीपर्यंत ) या राष्ट्रीय महामार्गाच्या एलिव्हेटेड रस्त्याच्या रू ७५१४.६९ कोटी रकमेच्या कामांची निविदा प्रक्रिया सुरु आहे.तळेगाव चाकण शिक्रापूर NH548D या राष्ट्रीय महामार्गाच्या एलिव्हेटेड रस्त्याच्या रू.५२३४.३१ कोटी रकमेच्या कामांची प्रक्रिया सुरु आहे. नाशिका फाटा ते चांडोली NH60 या राष्ट्रीय महामार्गाच्या एलिव्हेटेड रस्त्याचारू.६३८८.४५ कोटी रकमेच्या कामांची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली.

> शिरूर लोकसभा मतदार संघामध्ये येणाऱ्या तिन्ही राष्ट्रीय महामार्गाचे एलिव्हेटेड कॉरिडॉरला व्हावा यासाठी पाठपुरावा सुरु होता. त्यानुसार चाकणच्या तळेगाव चौकात पुणे-नाशिक व तळेगाव चाकण-शिक्रापूर या दोन रस्त्यांपैकी एकावर ग्रेडसेपरेटर आणि दुसऱ्यावर उड्डाणपूल बांधण्याची आणि भविष्यात मेट्रो प्रकल्पासाठी नियोजन करण्याची सूचना केली. त्यानुसार डीपीआर सुधारणा करून पुढे सादर केला. नाशिक फाटा ते चांडोली या एलिव्हेटेड कॉरिडॉरला मंजूरी देण्याचा आग्रह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केला. त्यानुसार निविदा प्रक्रिया सुरु झाली. लवकरच या कामास सुरुवात होऊन पाठपुराव्याला यश मिळणारआहे.
>
> **- खासदार डॉ. अमोल कोल्हे**

> पुणे-नाशिक महामार्ग रूंदीकरण (एलिव्हेटेड कॉरिडॉर)च्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आचारसंहितेमुळे वर्कऑर्डरचे काम थांबलेले आहे. लवकरच हे काम सुरु होण्याच्या तयारीत आहे. रूंदीकरण झाल्यास महामार्गावरील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.
>
> **- सुवर्णसिंग वाघ,**
> **पुणे-नाशिक महामार्ग समन्वयक.**

# नवजात बालकांची तस्करी करणारी महिलांची टोळी गजाआड

## तस्करी करणाऱ्या सहा आरोपी महिलांमध्ये एक परिचारिका : वाकड पोलिसांनी पर्दाफाश केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवडमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नवजात बालकांची तस्करी करणाऱ्या टोळी चा वाकड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी सहा महिलांना वाकड पोलिसांनी अटक केली असून त्यांना १६ एप्रिल पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. सहा आरोपी महिलांमध्ये एक परिचारिका असून ती मुख्य सूत्रधार असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे.

पिंपरी- चिंचवड शहरातील वाकड परिसरात नवजात बालकांची तस्करी करणारी टोळी सक्रिय असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली होती. काही महिला जगताप डेअरी या ठिकाणी नवजात बालक विकण्यासाठी येणार असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी सापळा रचला.



१२ एप्रिल रोजी दुपारी सव्वाचार च्या सुमारास दोन रिक्षातून सहा महिला उतरल्या, त्यांच्याकडे सात दिवसांच नवजात बालक होतं. संशय बळावल्याने महिलांना वाकड पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं. पोलिसांनी नवजात बालका विषयी विचारपूस केल्यानंतर महिलांना समाधानकारक उत्तर देता आलं नाही. वाकड पोलिसांनी सहा महिलांना पोलीस ठाण्यात नेऊन त्यांच्याकडे अधिक चौकशी केली.

आरोपी महिला अवघ्या सात दिवसांच नवजात बालक विकण्यासाठी आल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं. धक्कादायक बाब म्हणजे याआधी देखील या महिला आरोपींनी पाच नवजात बालक विकल्याचं पोलीस चौकशीत उघड झाल आहे. महिला आरोपींमध्ये एक परिचारिका असून ती खाजगी रुग्णालयात काम करते. आर्थिक परिस्थिती नाजूक असलेल्या पालकांना हेरून परिचारिका त्यांना पैशाचं अमिश दाखवून नवजात बालक विकत घ्यायची. तेच बालक तिच्या टोळीच्या मदतीने इतर मुल- बाळ नसलेल्या पालकांना विकून त्यांच्याकडून पाच ते सात लाख रुपये घ्यायची. अखेर बालकांची तस्करी करणाऱ्या टोळीचा वाकड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

# ...अन् सुनेत्रा पवारांनी हातच जोडले!

## यंदा प्रथमच अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट आमने सामने

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघ लक्षवेधी ठरला असून यंदा प्रथमच अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट हे मतदारसंघात आमने सामने आले आहेत.

आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघ लक्षवेधी ठरला असून यंदा प्रथमच अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट हे मतदारसंघात आमने सामने आले आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे या मतदारसंघातून लढणार आहेत. यामुळे राज्यातील जनतेचं या मतदारसंघाकडे लक्ष लागून राहिले आहे. या सर्व घडामोडी दरम्यान आज पुणे लोकसभा मतदार संघाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ,शिरुर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि बारामती लोकसभा मतदार संघाच्या उमेदवार सुनेत्रा पवार या तीन ही पुणे जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवारानी मार्केटयार्ड येथे फळभाज्या विक्री करण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. तसेच यावेळी सुनेत्रा पवार यांच्या गाण्याचे लॉंचिंग झाले. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांच्याशी संवाद देखील साधला.



मागील आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात पत्रकाराशी संवाद साधताना मूळ पवार आणि बाहेरून आलेले पवार यांच्यात फरक आहे असे विधान करीत सुनेत्रा पवार यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला होता. त्या विधानावरून राजकीय वर्तुळात अनेक आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे. शरद पवार यांच्या विधानाबाबत सुनेत्रा पवार यांना विचारले असता, यावेळी त्या कमालीच्या भावुक झाल्या. त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यांनी हात जोडत उत्तर देणे टाळले. मात्र त्यांनी अन्य विषयावर भूमिका देखील मांडली.

आजपर्यंत शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचार केला. आता स्वतः साठी प्रचार करित आहात त्या प्रश्नावर सुनेत्रा पवार म्हणाल्या की, ज्यावेळी स्वतः साठी प्रचार करावा लागतो. त्यावेळी जबाबदारीची भावना असते. प्रत्येक मतदाराकडे जाऊन आपल्याला मतदान करावे असे आवाहन करून, त्यांच्यामध्ये एक प्रकारे विश्वास निर्माण करण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

'गेली अनेक दशके काम करणारे शरद पवार आणि कालचे वक्तव्य करणारे शरद पवार हे एकच आहेत का, असा प्रश्न पडू लागला आहे. लग्न करून सासरी आलेली मुलगी त्यालाच आपले घर मानते. परंतु, पवारांनी हा भेद करून चुकीचा पायंडा पाडला आहे', अशी प्रतिक्रिया राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली.

### सुनेत्रा पवार यांची भूमिका

विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांची मतदारसंघात कोणती कामे राहिली आहेत. तुम्ही निवडून आल्यावर कोणत्या कामांना प्राधान्य देणार त्या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जी विकास काम आवश्यक आहेत. ती येत्या काळात निश्चित केली जातील, अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, पुणे शहर आणि जिल्ह्याच्या आसपासच्या भागातील शेतकरी मार्केटयार्ड येथील बाजारपेठेत माल विकण्यास दररोज येत असतो. त्या पार्श्वभूमीवर आज मार्केटमध्ये येऊन शेतकरी वर्गाशी संवाद साधत आहे. येत्या काळात शेतकरी वर्गासाठी विविध सोयीसुविधा निश्चित आणल्या जातील असे देखील त्यांनी सांगितले.

# पुणे शहराच्या मध्यवस्तीत वाहतूक कोंडी!

## पुणेकरांची खरेदीसाठी गर्दी, वाहतूक पोलिसच चौकात नाहीत?

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराच्या मध्यवर्ती पेठांतील मुख्य रस्त्यांसह गल्ल्यांमध्ये शनिवारी सायंकाळी अडीच ते तीन तास मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. सर्वत्र कोंडी झालेली असताना ती कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलिस कर्मचारी रस्त्यावर नव्हते.

शहराच्या मध्यवर्ती पेठांतील मुख्य रस्त्यांसह गल्ल्यांमध्ये शनिवारी सायंकाळी सुमारे अडीच ते तीन तास मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. संपूर्ण टिळक रस्ता, बाजीराव रस्त्यावर शनिपार चौकापासून पूरम चौकापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. शिवाजी रस्त्यावर गोटीराम भैय्या चौकापासून शनिवारवाड्यापर्यंत वाहनांच्या रांगा होत्या. त्यामुळे वाहनचालकांना बराच वेळ कोंडीत अडकून राहावे लागले.



शनिवारचा दिवस असल्याने बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी होती. त्यामुळे दिवसभरच वाहनांची वर्दळ नेहमीच्या तुलनेत अधिक होती. शनिवारी सायंकाळपासून वाहतूक कोंडीला सुरुवात झाली. सर्वांत आधी शास्त्री रस्ता, टिळक रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. टिळक रस्त्यावर टिळक चौकापासून पूरम चौकापर्यंत वाहनांच्या रांगा होत्या.

बाजीराव रस्त्यावर दक्षिणमुखी मारुती मंदिर परिसरात आणि शनिपार चौक ते पूरम चौक या दरम्यान कोंडी होती. शिवाजी रस्त्यावर शनिवारवाड्यापासून गोटीराम भैय्या चौकापर्यंत (महात्मा फुले मंडईजवळ) कोंडी होती. त्या सर्वच रस्त्यांवर सायंकाळी सात ते रात्री नऊ या दरम्यान वाहतूक कोंडी होती. यातून मार्ग काढताना अनेक वाहनचालक बेशिस्तपणे वाहने चालवत होते; त्यामुळे कोंडीत भरच पडत होती..

### 'वाहतूक पोलिसच नाहीत'

**» शहराच्या मध्यवस्तीत सर्वत्र कोंडी झालेली असताना ती कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलिस कर्मचारी रस्त्यावर नव्हते, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या. शहर पोलिसांच्या नियंत्रण कक्षालाही नागरिकांनी फोन करून वाहतूक कोंडी आणि पोलिसांच्या अनुपस्थितीच्या तक्रारी केल्या. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा झाली नाही. आंबेगाव, नवले पूल परिसर, भारती विद्यापीठ या भागांतही मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होती. वाहतूक कोंडीमुळे पीएमटीच्या बसनाही मोठा फटका बसला.**

# ‘आयटीयन्स’चा ‘मोदी 3.0’ साठी बारणेंना पाठिंबा

## पिंपळे सौदागरमधील आयटी इंजिनिअर्सचा बारणे यांना निवडून आणण्याचा निर्धार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत यासाठी पिंपळे सौदागर भागात राहणाऱ्या आयटी इंजिनियर्सनी कंबर कसली आहे. ‘मोदी 3.0’ या नावाचा ग्रुप स्थापन करून त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- आरपीआय- रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारात स्वतःला झोकून दिले आहे.

खासदार बारणे यांनी शुक्रवारी संध्याकाळी रहाटणी व पिंपळे सौदागर भागात प्रमुख पदाधिकारी व मान्यवरांच्या भेटीगाठी घेतल्या. माजी नगरसेविका निर्मला कुटे यांच्या निवासस्थानी ‘मोदी 3.0’ या आयटी इंजिनियर्सच्या समूहाने बारणे यांची भेट घेऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला. खासदार बारणे यांनी गेल्या दहा वर्षात मतदार संघामध्ये केलेल्या विविध विकास कामांची माहिती सर्व तरुणांना दिली. पुढील पाच वर्षातील कामाच्या नियोजनाबाबतही त्यांनी या तरुणांशी चर्चा केली. ‘अब की बार, चार सौ पार’, ‘फिर एक बार, मोदी सरकार’ च्या घोषणांनी त्यांनी परिसर दणाणून सोडला.

जगात भारताची मान उंचावणाऱ्या पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मावळच्या जनतेमुळे मला मिळाली आहे. जनतेने मला खूप प्रेम दिले आहे. त्यामुळे कोणताही राजकीय दृष्टिकोन न ठेवता मी कामाचा ठसा उमटवू शकलो. उद्धव ठाकरे यांच्या निर्णयामुळे आम्हाला अडीच वर्षे बाजूला राहावे लागले, मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्णय घेतल्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार असणारी शिवसेना पुढे नेण्याचा निर्णय आपण घेतला असल्याचं श्रीरंग बारणे म्हणाले. 'तिसरी बार, बारणे खासदार' ही नवी घोषणा देण्यात आली समन्वयाच्या धोरणामुळे युद्धामध्ये व निवडणुकांमध्ये हे यश मिळते, हा इतिहास आहे. त्यामुळे महायुतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय शेवटपर्यंत राहणे आवश्यक आहे

### बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन

रहाटणी येथील क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन खासदार बारणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी कार्यक्रमाचे मुख्य संयोजक अरुण चाबुकस्वार तसेच निर्मला कुटे, राकेश नखाते आदी उपस्थित होते. या बाल आनंद मेळाव्याच्या निमित खासदार बारणे यांनी लहानग्यांसोबत काही आनंदाचे क्षण अनुभवले.

खासदार बारणे यांनी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवरांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यांच्या समवेत तानाजी बारणे, मयूर बारणे, धनंजय चिंचवडे, दीपक विष्णू गुजर, अंकुश कोळेकर, सुदर्शन देसले, प्रदीप दळवी, दिलीप कुसाळकर, कानिफनाथ तोडकर, शरद राणे, सागर खेडेकर, योगेश गोडांबे, कुणाल ओव्हाळ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते होते.

रहाटणी येथे हरेश तापकीर, राजू नखाते, प्रसाद नखाते, गोविंद नखाते, विश्वनाथ नखाते, दगडू नखाते, चंद्रकांत नखाते, सविता नखाते, अनिल नखाते, सतीश नखाते, राजू खांदवे, नीलेश नखाते, बाळासाहेब नखाते, हरिभाऊ नखाते, राकेश नखाते, गणेश शिवराम नखाते, मनोज नखाते, स्वप्नील नखाते, सविता खुळे, सुरेश गोडांबे, दत्तात्रय गोडांबे, नंदू गोडांबे, योगेश गोडांबे, हरीश रेलवानी, इनरव्हील क्लब ऑफ पुणे क्वीन्सचे अध्यक्ष अंजली दशरथी, माजी नगरसेवक कैलास थोपटे, कुणाल थोपटे, पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष संजय भिसे आदींच्या निवासस्थानी खासदार बारणे यांनी सदिच्छा भेट दिली.

### बारणे यांच्या विक्रमी मताधिक्याचा निर्धार

**» माजी नगरसेवक सुरेश भोईर यांच्या चिंचवड केशवनगर येथील कार्यालयात झालेल्या बैठकीत खासदार बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला. त्यावेळी सुरेश भोईर, मोरेश्वर शेडगे, नीलेश डोके, बाळासाहेब वाल्हेकर, विठ्ठल भोईर, गतीराम भोईर, रवींद्र प्रभुणे, सतीश बलकवडे, निवृत्ती गावडे, दत्ताराम भोईर, नारायण लांडगे, महेश बारसवडे, राहुल भोईर, खंडूशेठ चिंचवडे, कैलास गावडे, जयराम भोईर, शिवाजी देशमुख, दीपक भोईर, काळूराम गावडे, दत्तात्रय चिंचवडे, प्रमोद भोईर, भारत भोईर, सतीश पाटील, दिलीप भेगडे आधी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# मावळातील डोंगरांना बेकायदेशीर उत्खननाची कीड

## शासनाचा महसूल बुडवून माती, मुरुम यांचे उत्खनन करून विक्री



**पिंपरी | प्रतिनिधी**

शासनाचा महसूल बुडवून मावळ तालुक्यात राजरोसपणे बेकायदेशररित्या माती, मुरूम यांचे उत्खनन करून विक्री केली जात आहे. याकडे मात्र महसूल विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. शासकीय यंत्रणा निवडणूक कामात अडकली असल्याने या कामाला आणखी गती आली आहे.

नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या मावळ तालुक्यातील डोंगरांना आता उत्खननाची कीड लागलेली पाहायला मिळते आहे. मावळ तालुक्यातील डोंगर पोखरून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर गौण खनिजाचे उत्खनन होत असून असे उत्खनन होत असताना शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी बुडत आहे.

बेकायदेशररित्या गौण खनिजाचे उत्खनन रोखण्यासाठी तालुका पातळीवर महसूल विभागाचे तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांना कारवाई करण्याचा अधिकार असून अवैधरित्या होणारे गौण खनिजाचे उत्खनन रोखणे तसेच बेकायदेशररित्या गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची जबाबदारी देखील महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची आहे.

तसेच ग्रामीण भागातील गौण खनिजाचे होणारे उत्खनन रोखण्यासाठी गाव पातळीवर ग्राम दक्षता समिती स्थापन करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले आहेत. या ग्राम दक्षता समितीत सरपंच ,पोलीस पाटील, ग्रामसेवक, कोतवाल व तलाठी यांना नेमण्यात आले असून गावात होणाऱ्या गौण खनिज उत्खननाची माहिती लपविल्यास गावातील सरपंच व पोलीस पाटील यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत. मात्र या सर्व यंत्रणेने शासनाच्या आदेश केराची टोपली दाखविली असून बेकायदेशीर उत्खननास पाठीशी घातले जात आहे.

ग्रामीण भागात होत असलेल्या बेकायदेशीर उत्खननाची माहिती नागरिकांनी तहसीलदार किंवा तलाठी, मंडळ अधिकारी यांना दिली तरी ते कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाहीत. उलट माहिती देणाऱ्याला उत्खनन करणाऱ्यांकडून धमकावले जाते व किरकोळ रॉयल्टी भरून घेऊन बेकायदेशररित्या होणाऱ्या उत्खननास पाठीशी घातले जात आहे. स्वतःची तिजोरी भरण्याचे प्रकार मावळतालुक्यात सुरू आहेत. यामुळे शासनाला रॉयल्टीमधून मिळणारा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

तालुक्यात झालेल्या आम सभेत देखील या संदर्भात सर्वसामान्य नागरिकांनी आवाज उठविला होता. मात्र कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. कोणी रॉयल्टी घेतली आहे, किती ब्रासची रॉयल्टी भरून उत्खनन सुरू आहे, याची माहिती देण्यास देखील तहसील कार्यालयातील अधिकारी टाळाटाळ करत आहेत.

### रॉयल्टी 100 ब्रासची; उत्पन्न लाखोंचे

**» अनेक जण तर केवळ १०० ब्रास ची रॉयल्टी भरून लाखो ब्रासचे उत्खनन करून विक्री करत आहेत. यामुळे मावळ तालुक्यात सुरू असलेल्या व झालेल्या सर्व उत्खनन झालेल्या ठिकाणचे पंचनामे करण्याची मागणी नागरिक करत आहेत. तसेच रॉयल्टी देताना त्यासोबत दिलेल्या सर्व नियमांचे उलंघन या मातीचोरांकडून केले जात आहे..**

# मागणी तसा पुरवठा ; शिरुरला टँकरचा आधार

## तालुक्यातील अनेक गावांसह वाड्या वस्त्यांना उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाई

**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील अनेक गावांसह वाड्या वस्त्यांना उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना नागरिकांच्या मागणीनुसार शासनाकडून काही गावांना सध्या टँकरने पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. काही गावे आज देखील टँकरच्या प्रतीक्षेत आहेत.



शिरुर तालुका चासकमानमुळे सुजलाम सुफलाम झाला असल्याचे बोलले जात असताना आज देखील कान्हर मेसाई, पाबळ, केंदूर, मिडगुलवाडी, धामारी, डफळापूर, खैरेनगर, वरुडे, खैरेवाडी, मोराची चिंचोली, हिवरे, शास्ताबाद यांसह अन्य गावांना उन्हाळ्यात दुष्काळ जाणवत आहे. आजही कायम ही भीषणता आहे. या गावांनी पाण्यासाठी अनेक आंदोलने केली आहेत, सध्या या गावातील काही ग्रामपंचायतीच्या वतीने शिरुर पंचायत समितीकडे गावामध्ये पाण्याचे टँकर सुरु करण्याची मागणी केली आहे.

अखेर पाबळमध्ये दिवसाला सहा टँकरद्वारे २६ खेपा तर केंदूरमध्ये दिवसाला चार टँकरद्वारे १२ खेपा आणि धामारी गावठाणसाठी एका टँकरद्वारे ४ खेपा पाणी वाटप सुरु केले आहे. कान्हूर मेसाई गावासाठी देखील सध्या पंचायत समितीकडे पाण्याचे टँकर सुरु करण्याची मागणी केल्याचे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश डोके यांनी सांगितले आहे.

प्रत्येक वर्षी नागरिकांचा पाण्याचा संघर्ष थांबणे काळाची गरज निर्माण झाली आहे, शिरुर तालुक्यातील ज्या गावांमध्ये प्रत्येक वर्षी पाण्याची समस्या निर्माण होते. त्या गावांमध्ये शासनाकडून पाण्याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे.

याबाबत ठोस भूमिका अद्याप घेण्यात आलेली नाही. पाण्याच्या समस्येमुळे प्रत्येक वर्षी येथील नागरिकांना व शेतकऱ्यांना जनावरांचा चारा पुरविणे देखील जिकीरीचे होऊन शेतकऱ्यांचा जोडधंदा असलेला दुग्ध व्यवसाय सुद्धा अडचणीत आहे. मात्र, काही महिन्यांपूर्वी शिरुर तालुक्यातील बारा गावांनी पाण्यासाठी केलेल्या संघर्षाला अद्याप यश आलेले नाही. शिरुर तालुका टँकरमुक्त होणार की नाही असा देखील प्रश्न नागरिकांना पडला आहे.

उन्हाची तीव्रता जास्त असल्याने पाणी पातळी घटली असताना विहिरी कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत असल्याने शासनाने तत्काळ चारा छावणी सुरू करणे गरजेचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते शहाजी दळवी यांनी सांगितले.

**प्रस्ताव आल्यास कार्यवाही करू**

शिरुर तालुक्यातील पाबळ व केंदूर गावांच्या वाड्या वस्त्या साठी ग्रामपंचायत ने दिलेल्या प्रस्तावाद्वारे पाबळ साठी सहा टँकर तर केंदूरसाठी चार टँकरला मंजुरी देण्यात आली असून पुढील काही गावांचे मागणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे-देवकाते यांनी सांगितले.

**पाणीबचतीची गरज- दळवी**

सध्या उन्हाची तीव्रता जास्त असल्याने पाणीपातळी घटली व विहिरी कोरड्या पडल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाल्याने शेतकऱ्यांसाठी शासनाने तत्काळ चारा छावणी सुरू करावी तसेच ज्या भागात पाण्याचे टँकर सुरु झाले. तेथील नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते शहाजी दळवी यांनी सांगितले.

### वनविभागात पाणवठ्यांत पाणी सोडले

» शिरुर तालुक्यातील काही भागांमध्ये नागरिकांना पाण्याचा सामना करावा लागत असताना सध्या पशु पक्षांच्या देखील पाण्याची समस्या निर्माण झालेली असल्याने शिरुर वनविभागाच्या वतीने देखील काही भागात कृत्रिम पाणवठ्यांना टँकरद्वारे पाणी सोडले. चारा पिके पाण्याअभावी जळू लागली असल्याने चाऱ्याची समस्या जाणवू लागली आहे. त्यामुळे पावसाळ्यापर्यंत जनावरे जगवायची तरी कशी, असा प्रश्न पशुपालक शेतकऱ्यांना पडला असल्याने चारा छावणी सुरू करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

# निकृष्ट पोषण आहाराची चौकशी करा : अमोल कोल्हे

## खासदार कोल्हेंनी सरकारला धरले धारेवर : कंत्राटदारावर कारवाई करा

**पुणे | प्रतिनिधी**

आंबळे येथील बाळंतीण शिद्यातील आहाराची चौकशी करा, अशी अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पालकमंत्री यांच्याकडे केली आहे. दरम्यान, सत्ताधाऱ्यांचे लक्ष केवळ आणि केवळ निवडणुकीवरच असल्यामुळे प्रशासन वाऱ्यावर सोडले आहे. त्यामुळे नेमकं कोणाचं पोषण सुरु आहे, हा प्रश्न आहे. गरोदर मातांचे आणि पोटातील बाळांचे पोषण होण्यासापेक्षा सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या कंत्राटदारांचे पोषण सुरु असल्याची टीका करीत अशा कंत्राटदारांवर कारवाई करा, असा आक्रमक पवित्रा कोल्हे यांनी घेतला आहे.

शिरुर तालुक्यातील आंबळे गावात पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाकडून बाळंतीण शिध्यात अळ्या व सोनकिडे सापडल्याचा धक्कादायक प्रकार (दि 12) रोजी उघडकीस आला होता. या प्रकरणामुळे शिरुर तालुक्यात मोठी खळबळ उडाली होती. खासदार कोल्हे यांनी सरकारला धारेवर धरले आहे.



बाजारातून एक्सप्राइरी डेट जवळ आलेला खराब होऊ शकणारा जुना माल खरेदी करायचा आणि तो चढ्या दराने कंत्राटातून विक्री करायचा अशी साखळी समोर येत आहे. त्यामुळे हे नेमकं पोषण कोणाचं कंत्राटदाराच की गरोदर माता आणि पोटातल्या बाळाचं असा प्रश्न अमोल कोल्हे यांनी उपस्थित केला आहे. संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही कोल्हेंनी केली आहे.

शिरुर तालुक्यातील आंबळे गावात पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाकडून गरोदर मातांना देण्यात आलेल्या पोषण आहारात गूळ, खारीक, काजू यात अळ्या आणि सोनकिडे आढळून आल्याने आंबळे येथील एका महिलेच्या पतीने याबाबत सोशल मीडियाव र पोस्ट केली होती

पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी निर्मला चोभे यांनी आंबळे (ता. शिरुर) येथे अंगणवाडीत जाऊन पोषण आहाराचा तक्रारदार महिलेच्या समक्ष पंचनामा केला. त्यानंतर हा आहार ताब्यात घेऊन तो तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवणार असून त्याचे रिपोर्ट आल्यानंतर संबधित ठेकेदार दोषी आढळून आल्यास त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे निर्मला चोभे यांनी सांगितले.

रोज वेगवेगळा आहार देणे बंधनकारक असताना ठेकेदार अटींचे उल्लंघन करून मनमानीपणे पोषण आहाराचा पुरवठा करत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचाच प्रश्न निर्माण झाल्याने तक्रारी पालकांनी केल्या.

शासनाकडून शालेय पोषण आहाराचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांना तांदळाचा पुरवठा केला जातो. मात्र, पुरवठा करण्यात आले ला तांदूळ ठेकेदारांकडून शिजवला न जाता तो बाहेर बाजारात जादा दरात विकला जातो आणि त्याहून खराब असलेला तांदूळ शिजविण्यासाठी विकत घेतला जात असल्याची चर्चा दबक्या आवाजात होत आहे.